# उप वनसंरक्षक, अलिबाग वन विभाग, अलिबाग यांचे कार्यालय

मु.पो.ता.अलिबाग जि. रायगड पीन नं. 402201, फोन नं. 02141-222016, ईमेल dycfalibag@mahaforesg.gov.in

पत्र

विषयः- उरण चाकण शिक्रापुर एल.पी.जी. पाईपलाईन ऑप्टीकल फायबर केबल लाईन टाकणेसाठी वनक्षेत्र मागणी प्रस्ताव क्षेत्र 9.4040 हेक्टर अंतर्गत अतिरिक्त वनक्षेत्र मागणी प्रस्ताव.. क्षेत्र 0.8878 हेक्टर

जावक क्र. ब/20/जमिन/3085/2016-17.
अलिबाग - 402 201, दिनांकः- 05/10/2016

प्रति,

मुख्य व्यवस्थापक,
एल्.पी.जी. प्रोजेक्ट,
हिंदूस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन लि.
8, सुरजी वल्लभदास मार्ग, पोस्ट बॉक्स नं. 155,
मुंबई- 400 001.

संदर्भः- 1) आपलेकडील पत्र दिनांक 7 जुलै, 2016.
2) या कार्यालयाकडील पत्र क्र. ब/20/जमिन/2724, दिनांक 15/09/2016.

उरण चाकण शिक्रापुर एल.पी.जी. पाईपलाईन व ऑप्टीकल फायबर केबल लाईन टाकणेसाठीचे 9.4040 हेक्टर वनजमिन मागणीचे प्रस्तावास केंद्रशासनाने मान्यता प्रदान केलेली आहे. सदर पाईपलाईन व ऑप्टीकल फायबर केबल करीता मंजूर करण्यात आलेल्या आखणी मार्गामध्ये बदल होत असल्याने आपणाकडून अतिरिक्त 0.8878 हेक्टर वनक्षेत्र मागणी प्रस्ताव संदर्भिय पत्रान्वये या कार्यालयात दाखल करण्यात आलेला आहे.

सदर प्रस्तावाची छाननी केली असता त्यामध्ये खालील प्रमाणे त्रुटी आढळून येत आहेत.

1) केंद्रशासनाने मंजुरी दिलेल्या आखणी मार्गातील मौजे दिघाटी व कळंबुसरे येथील शीववेवर **Point A** चे अंतर 275 मीटर आहे. या सीमेवरील **Match Point** मधील अंतर 300 मी. दर्शविले त्यामुळे कळंबुसरे या शीववरील आखणी मार्गात बदल होणेची शक्यता आहे. तरी याबाबत प्रकल्प यंत्रणेकडून खुलासा करणे आवश्यक आहे.
2) प्रकल्प यंत्रणेने मौजे दिघाटी, ता. पनवेल "राखीव वन" स.नं. 78 मधील **BC** मधील अंतरात 1040 हे. आर क्षेत्राची मागणी केली आहे. सदर नवीन आखणी मार्गातील मागणी केलेले वनक्षेत्र अतितीव्र उताराचे **(Vertical Cliff/ Steep Slope)** असलेचे दिसून येत आहे. सदर क्षेत्रांत तांत्रीकदृष्टया वनेत्तर कामे कशा पध्दतीने होणार आहेत व वनेत्तर कामे करतांना **LPG Pipe-Line** व्यतीरीक्त (1040 मी. व्यतिरिक्त) वनक्षेत्राचा वनेत्तर कामासाठी

वापर होणार अगर कसे? पाईपलाईन करीता अवजड वाहने, मशीनरी ने-आण करणेकरीता कोणत्या वनक्षेत्राचा वापर होणार आहे. याबाबत आपणाकडून खुलासा होणे आवश्यक आहे.

तरी वरील प्रमाणे त्रुटींची पुर्तता करुन प्रस्ताव या कार्यालयास फेर सादर करावा. सोबत प्रस्तावाचे 7 संच परत केले आहेत.

सहपत्र:- वरील प्रमाणे.

उप वनसंरक्षक,
अलिबाग.

प्रतः- सहाय्यक वनसंरक्षक, पनवेल यांचेकडे माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्रतः- परिक्षेत्र वन अधिकारी, पनवेल यांचेकडे माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्रतः- वनक्षेत्र सर्व्हेक्षक, अलिबाग.